 सं.फौ.ख.क्र.३६७/२०२६

MHNG110004492026

**श्री. पी.के.मुटकुळे, न्यायदंडाधीकारी, प्रथम वर्ग, कुही, जि.नागपूर.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अपराध घडल्याचा दिनांक | | ०९/०३/२०२६ |
| २ | अहवालाचा किंवा फिर्यादचा दिनांक | | ०९/०३/२०२६ |
| ३ | फिर्यादीचे नांव, त्याच्या आई व वडिलांचे नांव, त्याचे वय व निवासस्थान इ. | | पोलीस निरिक्षक, पोलीस ठाणे, कुही, ता. कुही, जि. नागपूर. |
| ४ | आरोपीचे नांव, आरोपीच्या आई व वडिलांचे नावगांव व त्याचे निवासस्थान इ. | | नरेश भैयाजी कावळे, वय– ४० वर्षे, रा. चांपा, ता. उमरेड, जि. नागपूर, |
| ५ | (अ) ज्याबद्यल फिर्याद दिली आणि जो अपराध आरोपीला समजावून सांगण्यात आला त्या अपराधाचा तपशील – | | |

दिनांक ०९.०३.२०२६ रोजी, ०९.५९ वाजताच्या सुमारास, तुम्ही तुमच्या ताब्यातील वाहन क्र. एम.एच.४९/बी.झेड.–९१४६ मध्ये विना परवाना अवैध प्रवासी वाहतुक करत असतांना आढळुन आले व त्यायोगे मोटार वाहन कायदा कलम ६६/1 सह १९२ अन्वये शिक्षापात्र असलेला या न्यायालयाच्या दखलक्षेत्रात गुन्हा केला.

आणि म्हणून मी तुमच्यावर सदरहू आरोप ठेवीत आहे.

(पी. के. मुटकुळे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कुही,
जि. नागपूर.

दि. २४.०३.२०२६

**<u>आरोपीचे निवेदन –</u>**

| | | |
|---|---|---|
| प्रश्न १ | | तुम्हाला केसच्या नकला मिळाल्या काय ? |
| उत्तर | | होय. |
| प्रश्न २ | | तुम्हाला वाचुन व समजावुन सांगितलेला आरोप समजला काय ? |
| उत्तर | | होय. |
| प्रश्न ३ | | तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ? |
| उत्तर | | होय, मला गुन्हा कबुल आहे. |

--------------

आरोपीची सही/अंगठा

(पी. के. मुटकुळे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,कुही,
जि. नागपूर.

दि. २४.०३.२०२६

## न्यायनिर्णय

आरोपीने त्याला गुन्हा मान्य व कबूल असल्याचे कथन केलेले आहे. तसेच, त्याने पुरसीस दाखल केली आहे. आरोपी स्वखुशीने गुन्हा कबुल करत असल्याची खात्री केली. आरोपीचा गुन्हा हा पहिलाच असल्यामुळे मोटार वाहन कायदा कलम ६६/१ सह १९२ मध्ये नमुद केल्याप्रमाणे, दंड द्रव्याचे शिक्षेवर आरोपीस दोषी ठरविले. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**– आदेश –**

१. आरोपी नरेश भैयाजी कावळे याची भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २२९ प्रमाणे मोटार वाहन कायदा कलम ६६/1 सह १९२ या गुन्ह्यासाठी दोषी ठरविले. आरोपीस रुपये २,०००/– (रुपये दोन हजार) चा दंड केला व दंड न भरल्यास चार दिवस साधी कैद भोगावयाची आहे. तसेच आरोपीस न्यायालय उठे पावेतो शिक्षा करण्यात आली आहे.

२. या न्यायनिर्णयाची एक प्रत आरोपीला ताबडतोब मोफत देण्यात यावी.

PARASRAM KUNDLIK MUTKULE

Digitally signed by PARASRAM KUNDLIK MUTKULE
Date: 2026.03.24 16:53:05 +0530

(पी. के. मुटकुळे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कुही, जि.नागपूर.

दि. २४.०३.२०२६